**महाराष्ट्र शासन**

**आदिवासी विकास विभाग**

**प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक**

**(विशेष भरती मोहीमे अंतर्गत मागासवर्गीयांचा अनुशेष व अपंग संवर्गातील भरती)**

---

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक ता. जि. नाशिक हे त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय आश्रमशाळा / वसतिगृहांसाठी गट ड (वर्ग ४) मधील विशेष भरती मोहीमेअंतर्गत मागासवर्गीयांचा अनुशेष व अपंग संवर्गातील सरळसेवेने खालील अटींची पूर्तता करणा-या पात्रताधारक उमेदवारांकडून खालील पदांकरीता विहीत नमुन्यातील अर्ज दिनांक २३/१२/२०११ पर्यंत मागवित आहेत.

| अ. क्र | पदनाम | एकूण पद संख्या | प्रवर्ग निहाय पदे | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ जा | अ ज | वि जा अ | भ ज ब | भ ज क | भ ज ड | वि मा प्र | इ मा व | खुला | एकूण |
| १ | स्वयंपाकी (अपंग) | ०३ | -- | -- | २ (क्षीण दृष्टी ) | -- | १ (श्रवण शक्तीतील दोष) | -- | -- | -- | -- | ३ |
| | **एकूण** | | **--** | **--** | **२** | **--** | **१** | **--** | **--** | **--** | **--** | **३** |
| २ | कामाठी (अपंग) | ०२ | -- | -- | १ (श्रवण शक्तीतील दोष)) | -- | १ (श्रवण शक्तीतील दोष) | -- | -- | -- | -- | २ |
| | **एकूण** | | **--** | **--** | **१** | **--** | **१** | **--** | **--** | **--** | **--** | **२** |
| | **एकूण** | ५ | -- | -- | ३ | -- | २ | -- | -- | -- | -- | ५ |

<u>टिप</u>:-

१) वरील प्रमाणे प्रवर्ग व संवर्गनिहाय नमुद केलेली पदे कमी अथवा जास्त होऊ शकतात.

२) वरील पदांकरीता लागु असलेल्या प्रवर्ग / संवर्गामधील उमेदवारांनीच अर्ज पाठवावेत इतर प्रवर्ग / संवर्गातील उमेंदवारांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३) शासनाने भरतीबाबत/नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परीपत्रके, आदेश इ. लागु राहतील तसेच भरतीच्या नियमांमध्ये प्रक्रीया पुर्ण होईपावेतो सुधारीत शासन निर्णय/ परीपत्रकानुसार बदल होवु शकतो.

**१) शैक्षणित पात्रता**:- १) स्वयंपाकी, कामाठी या पदांकरीता किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. (अर्जासोबत ईयत्ता ४ थी च्या गुणपत्रीकेची साक्षांकीत प्रत सोबत जोडावी. इ. ४ थी पास गुणपत्रीकेची प्रत अर्जासोबत न जोडल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.)

**२) वेतनश्रेणी** :- १) स्वयंपाकी :- रुपये ४४४०-७४४० ग्रेड पे रुपये १६००

२) कामाठी :- रुपये ४४४०-७४४० ग्रेड पे रुपये १३००

**३)वयोमर्यादा** :- १) दिनांक २५/ ११/२०११ रोजी सर्व पदांकरीता उमेदवारांचे वय किमान १८ वर्ष पूर्ण असावे.

२) अपंग उमेदवारांचे वय जाहीरातीच्या दिनांकास म्हणजेच दिनांक २५/११/२०११ रोजी ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**४) आरक्षण, सवलत व सर्वसाधारण अटी :-**

१. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक)

२. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये वरील पदाच्या सेवा प्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणुन विहीत नमुन्यांतील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदरचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत प्राप्त न झाल्यास संबंधीत उमेदवाराचा अर्ज रद्द करण्यांत येईल.

३. शासकीय/निमशासकीय सेवेतील कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज कार्यालय प्रमुखामार्फत विहीत मुदतीत अध्यक्ष, निवड समितीस प्राप्त होतील अशा बेताने पाठवावेत. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यांत येणार नाही. तसेच त्याचबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४. शासन निर्णय क्रमांक-अनियो- १००५/१२५/सेवा - ४/दि. ३१/१०/२००५ मधील तरतुदीनुसार दिनांक १/११/२००५ नंतर नियुक्ती साठी पात्र ठरणा-या कर्मचा-यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहिल. मात्र सध्य अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र सेवा निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाहनिधी योजना त्यांना लागु होणार नाही.

५. सर्व पदांच्या निवडी या गुणवत्तेनुसार नाशिक प्रकल्पापुरत्या व त्यातील रिक्त पदाच्या संख्येपुरत्याच गुणवत्तेनुसार केल्या जातील या पदाचे नियुक्तीचे सर्व अधिकार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक यांना राहतील.

६. रिक्त पदाच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदाची संख्या, समांतर आरक्षण याबाबत बदल करणे परीक्षा स्थगीत करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक हे स्वत: कडे राखुन ठेवीत आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

७. सदर जाहिरातीत उल्लेख केलेली शैक्षणिक अहर्ता, वयोमर्यादा, अनुभव, इत्यादी अटी संबंधीत पदासाठी आवश्यक असलेली किमान पात्रता दर्शविता उपलब्ध पदांच्या तुलनेत प्रथमदर्शनी अर्हताप्राप्त उमेदवारांच्या अर्जांची संख्या जास्त असल्यास परिस्थीतीनुसार चाळणी करुन विशिष्ट निकष ठरवुन मुलाखतीला बोलावावयाच्या उमेदवारांची संख्या मर्यादीत केली जाईल. ठरविलेला निकष त्या त्या वेळच्या परिस्थितीवर अवलंबुन राहील. (उक्त पदांकरीता चाळणी परीक्षा घ्यावयाची ठरल्यास महाराष्ट्र शासनाने इ. ४ थी साठी निर्धारीत केलेला नियमीत अभ्यासक्रम तसेच इ. ४ थी चा पुर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा अभ्यासक्रम यावर आधारीत वस्तूनिष्ठ बहुपर्यायी ७५ गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेनंतर प्राप्त केलेल्या गुणांच्या गुणवत्तेवर गुणानुक्रमे यादी तयार करुन उमेदवारांना तोडी मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. तोंडी मुलाखत २५ गुणांची असेल. लेखी परीक्षा घेतली गेल्यास लेखी परीक्षेतील गुण व मुलाखतीचे गुण एकत्रित करुन अशा एकत्रीत गुणांवरुन गुणवत्ते नुसार व प्रवर्गनिहाय अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.)

८. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दवडून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी व नियुक्ती निवड प्रकीयेच्या/सेवेच्या कोणत्याही टप्प्या वर रद्द करण्यांत येईल.

९. विहीत नमुन्यानुसार/निकषानुसार अर्ज नसल्यास सदर अर्ज नाकारण्याचा अधिकार निवड समिती स्वत: कडे राखुन ठेवत असुन त्या संदर्भात उमेदवारास काहीही कळविण्यांत येणार नाही.

१०.उमेदवार ज्या (मागासवर्गीय) राखिव जाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जाती प्रवर्गाचे सक्षम अधिका-याने निर्गमीत केलेले जातीचे प्रमाणपत्राच्या साक्षांकीत केलेल्या छाया प्रती जोडाव्यात.

११. मागास प्रवर्गातील उमेदवारांनी समाजिक न्याय विभागाने निश्चित केले निकष व अटी नुसार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलियर) सक्षम अधिका-याने दिलेले सन २०११-१२ साठी वैध असलेल्या प्रमाणपत्राची प्रमाणित सत्यप्रत अर्जासोबत सादर केली तरच त्यांना संबंधीत आरक्षणाचा लाभ दिला जाईल अन्यथा दिला जाणार नाही.

१२.जिल्हा रोजगार स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणीकेलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकीत छायाप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१३.उमेदवारास लेखी परीक्षा घेण्याचे ठरल्यास परीक्षेसाठी व मुलाखतीस स्वखर्चाने हजर रहावे लागेल त्यासाठी वेगळा प्रवास खर्च वा ईतर कोणताही खर्च/भत्ता दिला जाणार नाही.

१४.उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१५.टपाल खात्यामार्फत कोणत्याही प्रकारे अर्ज/इतर कागदपत्र मुदतीत पोहोचण्यास विलंब झाल्यास त्यासाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१६.सामान्य प्रशासन विभाग, शासन परीपत्रक क्र. बीसीसी २००९ /प्र.क्र.२९१/०९.१६-ब दिनांक ५ नोव्हेंबर २००९ मधील मुद्दा क्र. ७ नुसार मागास प्रवर्गाच्या निवड झालेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय नियुक्ती दिली जाणार नाही.

१७.महिला आरक्षण हे महिला बालकल्याण विभाग शासन निर्णय क्र. ८२/२००१/म.स.आ. २०००/ प्र.क्र. ४१५/का २ दिनांक २५ मे. २००१ मधील तरतुदी नुसार आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षणाअंतर्गत अर्ज करणा-या महिला उमेदवारांनी सन २०११-१२ या कालावधीकरीता वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रीमिलेअर) प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१८.या कार्यालयामार्फत दिनांक २८ जुलै २००९ रोजी दैनिक भ्रमर व देशदुत या दैनिकांत वर्ग ४ च्या पदभरतीसाठी जाहीरात प्रसिध्दीस देण्यात आलेली आहे. सदर भरती प्रक्रीयेस स्थगिती आहे तथापी दिनांक २८ जुलै २००९च्या जाहीरातीनुसार ज्या उमेदवारांनी यापुर्वी अर्ज केलेले असतील असे उमेदवार आता प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार पात्र ठरत असतील तरे ते या जाहिरातीद्वारा भरावयाच्या पदांकरिता अर्ज करु शकतात.

**५) अर्जकरण्याची पध्दत :-**

**अ)** इच्छुक व पात्र उमेदवारांनी सोबत दिलेल्या नमुन्यांत A-४ (१२ X १० ) आकाराच्या पांढ-या जाड कागदावर एका बाजुस टंकलिखीत करुन/सुवाच्च अक्षरात संपुर्ण माहिती भरावी व ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नाव ठळक अक्षरात नमुद करावे

**ब)** उमेदवाराने अर्जासोबत स्वत:चा पत्ता असलेला व रु. ५/- च्या पोष्टाचे तिकीट असलेला २५ x १२ सेमी आकाराचा लिफाफा जोडणे आवश्यक आहे. परिपूर्ण अर्ज दिनांक २३/१२/२०११ पर्यंत अथवा तत्पुर्वी खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.४५ पर्यंत) पोष्टाद्वारे पाठवावा, मुदतीनंतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही. हस्तेपोच अथवा खाजगी कुरीअर इ. मार्फत अर्ज प्रकल्प कार्यालयात स्विकारले जाणार नाही याची दक्षता घ्यावी.तसेच पोस्ट दिरंगाईस  हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**कार्यालयाचा पत्ता :- प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक  १ ला मजला, आदिवासी विकास भवन, गडकरी चौक, नाशिक ४२२ ००२.**

**क)** पासपोर्ट आकाराचे स्वता:चे अलिकडचे छायाचित्र उमेदवाराने अर्जामध्ये दर्शविलेल्या ठीकाणी चिकटवुन त्यावर राजपत्रीत अधिका-याचे साक्षांकन करणे आवश्यक राहील.

**ड)** उमेदवाराने अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, इ. ४ थी ची गुणपत्रिका, जात प्रमाणपत्र, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केलेले प्रमाणपत्र, लहान कुटुंब मर्यादेचे, राष्ट्रीयत्व व आधिवास, नॉन क्रीमीलेअर, जिल्हा शल्य चिकीत्सक यांचेकडील अपंगत्वाचे (किमान ४०%)प्रमाणपत्र इ. आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. असे न केल्यास अर्ज अपुर्ण समजुन तात्काळ नाकारण्यास योग्य समजला जाईल. उमेदवाराने अर्जासोबत कोणत्याही प्रमाणपत्राच्या मुळप्रती जोडु नयेत.कोणत्याही कागदपत्राची साक्षांकीत प्रत नसेल तर सदरचे कागदपत्र अग्राह्य धरुन अर्ज फेटाळण्यात येईल.

स्वाक्षरी/-
प्रकल्प अधिकारी
तथा अपर जिल्हाधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
नाशिक.